


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक १९८ वा ■ ■ अमरावती, शनिवार,दिनांक ७ मार्च २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १६ फाल्गुन १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# अर्थसंकल्पात विकासाचा रोडमॅप
# शेतकऱ्यांसाठी २ लाखांची कर्जमाफी
## ज्योतिर्लिंग, बुलेट ट्रेनसह फडणवीसांच्या मोठ्या घोषणा

मुंबई दि. ६ : विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी त्यांनी दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी फडणवीस म्हणाले, हे भाषण करताना माझे मन जड झाले आहे. सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री पद आणि वित्त विभागाची धुरा सांभाळणारे राज्याचे लाडके नेते अजित पवार आज आपल्यात नाहीत. त्यांच्या जाण्याने राज्याच्या



सार्वजनिक जीवनात आणि प्रशासनात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांना श्रद्धांजली म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसं असं भव्य स्मारक उभारण्यात येईल. तसेच त्यांच्या नावाने गतिमान नागरी सेवा हा पुरस्कार देण्यात येईल, अशी घोषणा करतो. दिवंगत अजित पवार यांना आजचा हा अर्थसंकल्प समर्पित करतो असे फडणवीस म्हणाले.

**अर्थसंकल्पातील महत्वाच्या घोषणा**

मुंबई येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारकाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता जून २०२६ पर्यंत दुसरा टप्पा पूर्ण करण्यात येईल. तर बाळासाहेब ठाकरे यांच्या दादरमधील स्मारकाचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अंतिम काम जूनपर्यंत होईल. तर योजना पण लवकरच सुरू होईल.

महात्मा फुले यांच्या जयंतीला २०० वर्ष पूर्ण *(पान २ वर)*

## माहोल....




**अर्थसंकल्पात मध्ये सगळं आहेफक्त 'सामान्यांना नेमकं काय मिळणार?' हा छोटासा प्रश्न आहे साहेब!!**

# युपीएससी सिव्हिल सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर
## अनुज अग्निहोत्री देशात प्रथम

नवी दिल्ली दि. ६ : संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) ने आज शुक्रवारी सिव्हिल सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर केला आहे. या प्रतिष्ठित परीक्षेत अनुज अग्निहोत्री यांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यांच्या पाठोपाठ राजेश्वरी सुवे एम यांनी दुसरा, तर आकांक्षा धूल यांनी तिसरा क्रमांक मिळवला आहे.



या वर्षी एकूण ९५८ पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात आली असून त्यापैकी १८० उमेदवारांची निवड झाली आहे.

युपीएससी सिव्हिल सेवा परीक्षेच्या टॉप १० मध्ये अनुज अग्निहोत्री, राजेश्वरी सुवे एम आणि आकांश धुल यांच्यासह राघव झुनझुनवाला, ईशान भटनागर, जीनिया अरोड़ा, *(पान २ वर)*







